नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 05/03/2021 (गुरूवार)
(सकाळ)

---

## खून

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 12 कि. मी अंतरावर कुंभारपुर शेतशिवार येथे दिनांक 04/03/2021 चे 16.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– अजय भोसवराव वडे, वय 40 वर्ष, रा. कोपरा, ता. मौदा हे आपल्या शेतात 10.00 वा. त्यांचा सालगडी गजानन सोबत शेतात आले असता अंदाजे 16.30 वा. दरम्यान बाजुच्या शेतामधुन एक स्त्री चे जोरात ओरडण्याचा आवाज आला. त्यामुळे फिर्यादी व त्याचा मित्र त्या दिशेन धावत गेले असता, समोरील बाजुच्या शेतामध्ये आरोपी नामे– अभय दिवाकर येसकर, वय 32 वर्ष, रा. कुभांपुर ता. मौदा याने त्यांना जोराने ओरडुन म्हणाला की, ''साल्यांनो इकडे येवु नका नाही तर तुम्हाला पाहुन घेईन.'' त्यावेळेस आरोपीचे हातात कु–हाड होती. त्याने त्याची पत्नी सौ. कांचन अभय येसकर, वय 26 वर्ष, हिच्या डोक्यात कु–हाड घातल्याने ती जोरात मेलो असे म्हणुन शांत झाली. तेव्हा फिर्यादी हे घटनास्थळावर आले तेव्हा त्यांनी पाहिले की, आरोपीची पत्नी सौ. कांचन ही मृत अवस्थते आढळुन आली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 302 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री. विजय जाधव 9870328904 हे करीत आहे.

## रेती चोरी करणाऱ्या आरोपी अटक

1) पो. स्टे. खापा :– अंतर्गत 09 किमी अंतरावर कोच्छी शिवार कन्हान नदीचे पात्र येथे दिनांक 04/03/2021 चे 16.00 वा. ते 17.00 वा. दरम्यान विना क्रमांकाचा ट्रैक्टर व एमएच–40/ए–521 क्रमांकाची ट्रॉलीचा चालक आरोपी क्र– 1) अशोक नेमचंद वाघमारे, वय 43 वर्ष, रा. कोच्छी, एमएच–40/ए.यम–350 क्रमांकाचा ट्रैक्टर व विना क्रमाकाची ट्रॉलीचा चालक 2) मेघलाल फुलचंद वरखडे, वय 31 वर्ष, रा. कोच्छी व एमएच– 40/एल– 7074 क्रमाकाचा ट्रैक्टरचा चालक आरोपी क. 3) भावराव शेशराव शालु, वय 22 वर्ष, रा. बावनगाव यांनी त्यांच्या ताब्यातील वाहनात विना परवाना अवैधरित्या एकुण 2 ब्रास रेती किं. 6,000/– रू. रेती भरून वाहतुक करतांना मिळुन आले. तीन्ही वाहनासह एकुण 15,06,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस गंगाधर ठाकरे यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम 379, 109, 511, 34 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोनि श्री मानकर हे करीत आहे.

2) पो. स्टे. पारशिवनी :– अंतर्गत 07 किमी अंतरावर मौजा दहेगाव जोशी येथे दिनांक 04/03/2021 चे 07.20 वा. ते 07.50 वा. दरम्यान आरोपी क्र. 1) प्रमोद उर्फ मुकेश मोरेश्वर बोरकर वय 33 वर्ष रा. दहेगाव जोशी (चालक/मालक), 2) चंदु इश्वर हले वय 35 रा. दहेगाव जोशी (मालक), 3) आशिष लक्ष्मण सुरकार वय 20 रा. दहेगाव जोशी (चालक) व मालक हे त्याचे मालकीचे ट्रैक्टरला जोडुन असलेल्या ट्रॉलीमध्ये कन्हान नदीचे पात्रातुन अवैधरीत्या रेती उत्खनन करून रेतीची चोरटी वाहतुक करतांना मिळुन आले. आरोपीतांच्या ताब्यातुन 1) एक महिंद्रा युवो ट्रैक्टर मुंडा क्र. एम.एच–40/बी.एम– 1675 किं. 5,00,000 व ट्रॉली एम.एच– 40./एम– 2557 किं. 1,00000 एक ब्रास रेती कि. 3,000/–रू. 2) एक जॉन डिरे ट्रैक्टर क्रमांक एम.एच. 40/बी.जे. 3505 किं. 6,00,000/–रू विना क्रमांकाची ट्रॉली किं. 10,0000/–रू. व एक ब्रास रेती किं. 3,000 असा एकुण दोन्ही वाहनसह 13,06,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस नाईक संदीप कडु पो.स्टे. पारशिवनी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम 379, 34 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आहे. गुन्हयाचा पुढील तपास पो.उप.नि. संदीपान उबाळे पो.स्टे.पारशिवनी मो.क्र. 7498179174 हे करीत आहे.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर